सं.फौ.ख.क्र.४१६/२०२५.
शासन विरुध्द अमितकुमार.
नि.क्र. ८ पुढे सुरू.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४**

मी देवाची शपथ खरे सांगते की,
माझे नाव – मुरलीधर बच्चू कोकाटे.
वय – ७० वर्षे, कामधंदा – शेती.
राहणार – खटाव, तालुका खटाव, जिल्हा सातारा.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता सौ. ए. आर. सुळ -**

दिनांक ११.०५.२०२५ रोजी काय घटना घडली होती याविषयी मला काहीही सांगता येणार नाही. तथापि, त्यादिवशी आमच्या गाडीला अपघात झाला होता. तो अपघात कसा झाला होता हे मला सांगता येणार नाही. पोलिसांनी माझ्याकडे कोणतीही चौकशी केली नव्हती.

**सदर साक्षीदार सरकारपक्षाच्या कथनास समर्थन करीत नसल्याने त्यास सहायक सरकारी अभियोक्ता हयांनी उलटतपसाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.**

२. असे घडले नव्हते की, दिनांक ११.०५.२०२५ रोजी सायंकाळी ४.१५ वाजणेच्या सुमारास मी माझ्या मुलासह त्याच्या ओमनी कार मधून जात असताना एम.आय.डी.सी. रोड वाई येथील शुभम किराणा स्टोअर्स जवळ आमच्या गाडीला अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सदरचा अपघात समोरून येणारी बलेनो कार क्रमांक एम.एच-११-डी.ए-३३४२ हिला आमच्या गाडीने जोरात धडक दिल्याने झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सदरची कार चरीमध्ये जावून पडली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्या कारमधील लोकांना दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मला सुध्दा अपघातात दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी ओमनी चालक व आम्हाला तेथील हजर लोकांनी दवाखान्यात उपचाराकरीता पाठविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी फिर्यादीला तेथील लोकांच्या चर्चेतून आरोपीचे नाव अमित कोकाटे असे असल्याचे कळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, फिर्यादीने

आरोपीविरूध्द घटनेची फिर्याद दिली होती. आता मला माझे नाव असलेल्या जबाबातील अधोरेखांकित भाग-अ वाचून दाखविण्यात आला. तसे मी पोलिसांना सांगितले नव्हते. परंतु, पोलिसांनी तो जबाब तसा का लिहून घेतला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण,**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. खडसरे यांच्यातर्फे</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गाडीला नेमका कसा अपघात झाला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा कोणताही जबाब पोलिसांनी नोंदविलेली नव्हता.

**<u>उलटतपास पुर्ण</u>.**

***<u>फेरतपास काहीही नाही</u>.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. २३.०३.२०२६.

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१,वाई.